# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- ०५
## सभावृत्तांत

दिनांक - ०७/१२/२०१७ वेळ दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०७/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन **- अध्यक्षा**

२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

४) मा.गायकवाड निर्मला मनोज

५) मा.गोफणे अनुराधा देविदास

६) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

७) मा.बारसे प्रियांका प्रविण

८) मा.श्री.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

९) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.प्रमोद काशीकर – प्रशासन अधिकारी मा.श्री.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य). मा.श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत) मा.श्री.व्ही.सी.काळे- उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.ए.के. कोंडे – उपअभियंता (पा.पु.), मा.श्री.दवंडे एस.के. – उपअभियंता (पा.पु.), मा.श्री.राऊत व्ही.एस. – क.अभियंता (पा.पु.), मा श्री.संदेश खडतरे – उपअभियंता, बीआरटीएस, मा. श्री. कोतकर पी.बी.क.अभियंता (पा.पु.), मा.श्री.आर.व्ही शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.डी.डी.गवळी - उपअभियंता (ज.नि.), मा.श्री.बिडकर के.व्ही. -लेखाधिकारी, मा.श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), मा.श्री.ए.आर.धडस - क.अभियंता (ज.नि.), श्री.गनबोटे ए.पी. क.अभियंता(स्थापत्य), मा.जाधव व्ही.के.- क.अभियंता, स्थापत्य उद्यान, मा.श्री.निखील फेंडर क.अभियंता, स्थापत्य उद्यान, श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य.विद्यालय,भोसरी,, श्री.ए.आर.जाधव - मुख्याध्यापक माध्य.विद्यालय, भोसरी, श्रीम.जे.आर.पवळे- समुह संघटक, ना.वि.यो.पिंपरी, श्री.फुगे एन.जे.-प्र. क्रीडा पर्यवेक्षक, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-
-----

१ सुचक- मा. सागर गवळी अनुमोदक- मा. प्रियांका बारसे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, सौ.भिमाताई पोपट फुगे या आज आजारी असल्याने सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.हिराबाई (नानी) घुले यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली
-----

**( मा. मा.हिराबाई (नानी) घुले यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )**

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.
------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**
-----

**विषय क्रमांक – १)** बॅडमिंटन हॉल नामकरणाबाबत मा.प्रियांका प्रविण बारसे यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक –** २) दिघी येथील महोदव मंदीराशेजारी स्वागत कमान उभारणेबाबत सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक – ३)** दिघी येथील स.नं.७३ समोरील चौकास धर्मवीर संभाजी चौक असे नामकरण करणेबाबत सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक - ४)** दिघी येथील स.नं.३ येथील गायकवाड नगरमधील जलकुंभास कै.राघोबा दादा गायकवाड जलकुंभ असे नामकरण करणे आणि स.नं.२ जुना च-होली रस्ता या रस्त्याला कै.मारोती गायकवाड असे नामकरण करणेबाबत सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्र.
------

अ) दिनांक ०२/११/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रम पत्रिका ०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.
--------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**
------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक- १

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.सौ.प्रियांका बारसे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता विद्युत यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/विद्युत/३/कावि/ ४२७/ २०१७, दिनांक ९/११/२०१७ चे विषयपत्र.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागामध्ये सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकाच्या तरतूदमध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ३,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. इ क्षेत्रीय विभागात ५ (पाच) प्रशिक्षणार्थी वीजतंत्री व तारतंत्री या पदावर काम करीत आहेत. प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन हे माहे जुलै २०१७, ऑगस्ट २०१७, सप्टेंबर २०१७ या तीन महिन्याचे विद्यावेतन देणे बाकी आहे.

| अ.क्र. | लेखा शिर्षकाचे नांव | सन २०१७-१८ ची तरतूद | आवश्यक तरतूद वाढ करावयाची रक्कम | आवश्यक तरतूद घट करावयाची रक्कम | सुधारीत तरतूद सन २०१७ २०१८ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अस्थायी अस्थापना | ३,००,०००/- | १,५०,०००/- | ० | ४,५०,०००/- |
| २ | स्थायी अस्थापना | ३,७८,००,०००/- | ० | १५००००/- | ३,७६५०,०००/- |

सबब सध्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर असलेली र.रु.३,००,०००/- तरतूद कमी पडत असून येणारा प्रस्तावीत खर्च लक्षात घेता सन २०१७-१८ साठी सदरची तरतूद र.रु. १,५०,०००/- करण्यात यावी असे वाटते. त्यासाठी इ क्षेत्रीय विभागाच्या स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर ३,७८,००,०००/- इतकी तरतूद आहे. सदर तरतूदीमधून एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ अखेर झालेला खर्च २,४५,४१,६२९/- इतका आहे व उर्वरीत शिल्लक र.रु.१,३२,५८,३७१/- इतकी आहे. सबब स्थायी अस्थापना या लेखाशिर्षकावरुन र.रु.१,५०,०००/- इतकी तरतूद अस्थायी आस्थापना लेखा शिर्षकावर वर्ग करता येणे शक्य आहे. महाराष्ट्र अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षकातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षकामध्ये वर्ग करावयाच्या रक्कमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरचा विषयास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - २

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.सागर गवळी अनुमोदक – मा.प्रा.सोनाली गव्हाणे

संदर्भ – मा.सभापती सौ.भिमाबाई पोपट फुगे यांचे दि नांक २३/११/२०१७ चे पत्र आणि

नगरसदस्य श्री. सागर गवळी यांची दिनांक ७/१२/२०१७ ची उपसूचनाबाबत.

प्रभाग क्रमांक ७ भोसरी येथील स.न. १ मधील प्रेक्षक गॅलरीला समाजभूषण वस्ताद कै.सदाशिव रामभाऊ फुगे यांच नाव देणेबाबत तसेच क्रीडा संकुलला समाजभूषण वस्ताद

कै.सदाशिव रामभाऊ फुगे यांचे नांव देणेच्या विषयास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक- १

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सौ.प्रियांका बारसे यांचे दिनांक ०७/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्रमांक गंगोत्री पार्क, भोसरी येथील बॅडमिंटन हॉलला कै.सुरेश नारायण बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक- २

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - मा.सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ०७/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्रमांक ७ दिघी येथील महादेव मंदीरा शेजारील साई पार्क जाणा-या रस्त्यावर स्वागत कमान उभारणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक- ३

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - मा.सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ०७/१२/२०१७ चे पत्र.

दिघी येथील स.नं.७३, शिवदर्शन समोरील चौकास धर्मवीर संभाजी चौक असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक- ४

दिनांक - ०७/१२/२०१७

सूचक- मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ०७/१२/२०१७ चे पत्र.

दिघी येथील स.नं.३, गायकवाडनगर, दिघी पुणे – १५ येथील पाणीपुरवठा चालू असलेल्या जलकुंभास कै. राघोबा दादा गायकवाड असे नामकरण करण्यास आणि स.नं.२ जुना च-होली रस्ता या रस्त्याला कै.मारोती गायकवाड असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सौ.हिराबाई (नानी) घुले
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९.
क्र-इक्षेका/कावि/४/१३०२/२०१७
दिनांक- २१/१२/२०१७

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.